# सहकार व गृहखाते एकत्र !

महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.ना. श्री हर्षवर्धन पाटील व गृहमंत्री मा.ना. श्री आर.आर. पाटील ह्यांनी एकत्रितपणे राज्याच्या सहकार चळवळीबद्दल एका महत्वाच्या विषयावर सुतोवाच नुकतेच केलेले आहे. दोन्ही विभागाची भूमिका एका समान तत्वावर उभी आहे.

ज्या बँका व पतसंस्था ठेवीदारांच्या ठेवी मागणी करुन देवू शकत नाही व त्या ठेवी थकीत कर्जामुळे देणे शक्य नसल्यास, वसुलीसाठी शासन पुढाकार घेणार व ठेवीदारांच्या रकमा अदा करणार आहेत. म्हणजेच वसुलीचे काम सहकारी संस्थांच्या SRO ऐवजी शासनाचे SRO करणार ही बाब अभिनंदनीय व ऐतिहासिक आहे. हे काम ह्यापूर्वीच जर झाले असते तर थोर समाज सेवक श्री. अण्णासाहेब हजारेंना संघर्ष करावा लागला नसता.

परंतु ज्या संस्थांनी कर्जे नातेवाईक व हितसंबंधीयांना दिली व ती नियम तोडून दिली, त्यावेळी मात्र संचालकांवर थेट पोलीस कारवाया करणार असे जाहीर केले आहे. मा. सरकारला आम्ही अवगत करु इच्छितो की, कुठलीही बँक किंवा पतसंस्था कर्जाचे वाटप करताना नियम तोडून कर्जे थकीत करण्यासाठी करीत नाही, व भविष्यात सुध्दा करू शकणार नाही. कारण ह्यासाठी ह्या संस्था निर्माण झालेल्या नाहीत. राज्यात १ राज्य सहकारी बँक, ३१ जिल्हा सहकारी बँका, ७००नागरी सहकारी बँका, २५००० पतसंस्था आहेत. ह्या सर्व संस्था ठेवी घेवून कर्ज वाटप करणाऱ्या संस्था व त्यामध्ये काम करणारे कार्यकर्ते हे ठेवीदारांच्या व भागधारकांच्या हिताचे संवर्धन करण्यासाठीच काम करतात. अपवाद जरुर आहेत. किती टक्के ? ५ टक्के सुद्धा नाही. रक्कम किती ? ५टक्के सुद्धा नाही. अशा संस्थांची संख्या किती ? ५ टक्के सुद्धा नाही. परंतु विषय ज्या पद्धतीने प्रसिद्ध झाला आहे, ते आश्चर्यजनक आहे. सरकारची भूमिका जनतेच्या ठेवी मिळण्यासंदर्भात आहे. राज्यातील सहकारी संस्थांना ‘ सहकार कायदा ’ लागू आहे. बँकांना तर रिझर्व बँकेचे सुद्धा संरक्षण आहे.

‘ ठेव ’ हा शब्दच अत्यंत सूचक व अचूक आहे. एखादी व्यक्ती काही रक्कम काही कालावधीकरिता, काही व्याजाच्या अटींवर, स्वत: लेखी अर्ज करुन जी कृती करते, त्यालाच ठेव ठेवणे म्हणतात. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार राज्यात सव्वा दोन लाखाच्या दरम्यान संस्था नोंदणीकृत आहेत. देशाचे संविधान सगळयांसाठी समान आहे. आणि अशा परिस्थितीत ना. हर्षवर्धन पाटील व ना. आर.आर. पाटील ह्यांची धाडसी वक्तव्ये व भविष्यातील कृती ही देशाला नवीन क्रांतीचा विचार व संदेश देणारी ठरणार आहे.

महाराष्ट्र राज्यात २०० च्या दरम्यान साखर कारखाने आहेत. ह्यातील ८० टक्के कारखान्यांनी ठेवीदारांच्या ठेवी मुदत संपल्या तरी गेली १० वर्षांपेक्षा जास्त ठेवीदारांना वर्षे दिल्या नाहीत. काही कारखान्यांनी ठेवीवरचे व्याजही वर्षानुवर्षे दिले नाही. काही कारखान्यांनी तर ठेवीदारांच्या ठेवीची परतफेडीची मुदत स्वत:च बेकायदेशीरपणे वाढविली. ह्या रकमा ह्या क्षणापर्यंत १५ हजार कोटीं रूपयांच्या दरम्यान आहे. मायबाप सरकारने राज्यातील ह्या ठेवीदारांच्या ह्या शोषणाबद्दल कोणालाही ह्या क्षणांपर्यंत जेलमध्ये डांबलेले नाही. ठेवी घेणारे, ठेवींच्या रकमांची वासलात लावणारे, ऑडिट करणारे, शिक्षा करणारे, कारखान्यांवर आतून व बाहेरुन नियंत्रण ठेवणारे, ठेवीवर व आम जनतेबद्दल विचार मांडणारे व ठेवी न देणारे, इकडून तिकडून **साखर कारखान्यामध्ये एकच** आहेत. आता बोला! मा. सहकार मंत्री व मा. गृहमंत्री ह्यांना साखर कारखान्यांच्या संचालकांवर आता कारवाई करावी लागणार. त्यांना जेलमध्ये टाकावे लागणार. कारण कायदा समान आहे. आणि सरकार ‘ ठेव ’ ह्या विषयाबद्दल प्रत्येकासाठी स्वतंत्र भूमिका घेवू शकत नाही. म्हणून सरकारचे अभिनंदन.

संपूर्ण देश राज्य सरकारची वाहवा करणार आहे. आम्ही ह्याच निर्णयाची वाट पहात होतो. कारण ह्याच साखर कारखानदारांना सरकारने अनेक सवलती दिल्या, आर्थिक मदत केली, पॅकेजस् दिली, साखरेचे व उपपदार्थाचे भाव वाढवून दिले. जनतेला महागाईच्या अग्नित खाक करुन रोष ओढवून घेतला. पण साखर सम्राटांना म्हणजेच ठेवी परत न देणाऱ्यांना, बँकांचे हजारो कोटी रूपये थकविणाऱ्यांना व पुन्हा ह्या बँकावर हेच कारखानदार व त्यांचे हितसंबंधी सत्तेवर बसलेल्यांना आता मात्र नक्की ' कोमा ' मध्ये जावे लागेल. अशीच भूमिका सरकारने मांडली आहे.

आमची सरकारला विनंती आहे की, सरकारने ज्या साखर कारखान्यांची थक हमी घेतली होती, व त्या सर्व हजारो कोटी रुपयांच्या रकमा त्या बँकांना ३१ मार्च २०१० पुर्वी परत द्याव्यात. ठेवी परत न देणाऱ्यांना जेलमध्ये डांबण्याचे धोरण साखर कारखान्यांना लागू करण्याचे प्रत्यक्ष धाडस दाखवावे. कारण कारखान्यांनी राज्यातील किमान ५ कोटी शेतकरी – ठेवीदारांचे वर्षानुवर्षे आर्थिक शोषण केले आहे. जबरदस्ती ऊस बिलातून, सभासदांचे वैयक्तिक लेखी अर्ज नसताना ठेवीसाठीच्या रकमा कापल्या. व्याजही दिले नाही. व ठेवीही मुदत संपल्यानंतर परत दिल्या नाहीत. ऑडिटरही गप्प. साखर व सहकार आयुक्तही गप्प. पोलिसही गप्प. परंतु आता मात्र मा. ना. श्री हर्षवर्धन पाटील व मा.ना. श्री आर. आर. पाटील हे पुढे आले आहेत. चला आपण सर्वजण ह्यांचे अभिनंदन करु या.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

.....२,